महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५६ वा | दिनांक : १०/१२/२०२५ | वार : बुधवार


# २०१९ ची ती घटना मी विसरू शकत नाही : किरीट सोमय्या



**मुंबई :** पक्षासाठी मी आजवर अनेकदा त्याग आणि बलिदान दिले आहे. आता मला कोणत्याही पदाची लालसा नाही. मात्र, 2019 च्या लोकसभा निवडणुकीवेळी झालेला माझा अपमान मी आजही विसरलेलो नाही आणि कधीच विसरू शकत नाही, अशा शब्दांत भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आपल्या मनातील खदखद पुन्हा एकदा जाहीरपणे बोलून दाखवली आहे. एका बाजूला मी नाराज नाही असे सांगतानाच, दुसऱ्या बाजूला त्यावेळच्या तडजोडीबद्दल त्यांनी संतापही व्यक्त केला.

बनावट जन्म प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून किरीट सोमय्या यांनी आज मुलुंड-कुर्ला तहसीलदार कार्यालयात ठिय्या मांडला होता. या भेटीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी 2019 च्या राजकीय घडामोडींवर भाष्य केले. सोमय्या म्हणाले, मी देवेंद्र फडणवीस यांना स्पष्ट सांगितले आहे की, 2019 ची घटना मी विसरू शकत नाही. त्यावेळी केवळ उद्धव ठाकरे यांच्या हट्टापायी आणि जिद्दीमुळे मला भरसभेतून, पक्षाच्या मंचावरून बाहेर जाण्यास सांगण्यात आले. भाजपच्या ज्या नेत्यांनी त्यावेळी उद्धव ठाकरेंशी समझोता केला, ते ठीक आहे. पण ज्यांनी मला प्लॅटफॉर्मवरून बाहेर काढले, त्या भाजप नेत्याला मी कधीही माफ करू शकत नाही. यावेळी त्यांनी नाव न घेता अप्रत्यक्षपणे सुधीर मुनगंटीवार यांच्यावर निशाणा साधल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

पदाच्या नाराजीबद्दल विचारले असता सोमय्या म्हणाले, मला आता कोणत्याही पदाची गरज नाही. मी इतर कोणापेक्षाही हजारो पटीने पक्षासाठी काम करत आहे. भाजपचा सामान्य कार्यकर्ता माझ्यासोबत आहे, हेच माझ्यासाठी सर्वात मोठे पद आहे. मुंबईला बांगलादेशीमुक्त करण्यासाठी मी लढा देत आहे आणि घुसखोर मला घाबरत आहेत, हे माझ्या कामाचे यश आहे. दरम्यान, भाजपचे आमदार अमित साटम निवडणूक संचालक पदासाठी का हट्ट करत आहेत, याची मला कल्पना नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजप-शिवसेना युतीची घोषणा करण्यासाठी अमित शाह आणि उद्धव ठाकरे यांची संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. मात्र, जोपर्यंत किरीट सोमय्या तिथे उपस्थित आहेत, तोपर्यंत मी पत्रकार परिषदेला येणार नाही, असा आक्रमक पवित्रा उद्धव ठाकरे यांनी घेतला होता. अखेर युती टिकवण्यासाठी भाजप नेत्यांनी सोमय्या यांची समजूत काढत त्यांना हॉटेलमधून निघून जाण्यास सांगितले होते. स्वतःच्याच पक्षाच्या कार्यक्रमातून अपमानित होऊन बाहेर पडावे लागल्याचे शल्य सोमय्यांच्या मनात आजही कायम असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून दिसून आले.

## उद्धव ठाकरे यांना नगरपालिकांनंतर आता 'झेडपी' आणि महापालिकांचे वेध

**मुंबई :** राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे मतदान पार पडताच आता सर्व राजकीय पक्षांचे लक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लागले आहे. नगरपालिकांचे निकाल 21 डिसेंबरला जाहीर होणार असतानाच, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर आज मुंबईतील शिवसेना भवन येथे उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या जिल्हा संपर्कप्रमुखांची तातडीची बैठक घेत त्यांना महत्त्वाचे आदेश दिले.

नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकांच्या प्रचारात उद्धव ठाकरे सक्रिय दिसले नाहीत, मात्र आगामी निवडणुकांसाठी त्यांनी आतापासूनच तयारी सुरू केली आहे. आजच्या बैठकीत जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांमधील पक्षाच्या ताकदीचा आढावा घेण्यात आला. यावेळी ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या की, स्थानिक पातळीवर महाविकास आघाडी म्हणून उमेदवार सर्वांना मान्य आहे का, याची चाचपणी करा. तसेच, संबंधित मतदारसंघात मनसेची ताकद किती आहे, याचाही अंदाज घ्या.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत मोठी फूट पडली होती. त्या अनुषंगाने, उद्धव ठाकरेंनी सध्याच्या संघटनात्मक बांधणीचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. ग्राऊंड लेव्हलला काम करणारे निष्ठावंत पदाधिकारी कोण आहेत? सध्या किती शाखाप्रमुख कार्यरत आहेत आणि कोणत्या जागा रिक्त आहेत? तसेच, महापालिकेच्या प्रभागवार रचनेत पक्षाची स्थिती काय आहे? या सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करून त्याचा अहवाल सादर करण्याचे फर्मान ठाकरेंनी सोडले आहे.

दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटाने स्टार प्रचारकांची फौज मैदानात उतरवत प्रचारात मोठी आघाडी घेतली होती. यामध्ये खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी 30 हून अधिक सभा घेत संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही अखेरच्या दिवसापर्यंत प्रचाराचा धडाका लावला. मात्र, सत्ताधारी पक्ष पूर्ण ताकदीने मैदानात असतानाच दुसरीकडे उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे या प्रचारात कुठेही सक्रिय दिसून आले नाहीत, ज्यामुळे आता विरोधकांकडून त्यांच्यावर टीकेची झोड उठवली जात आहे.

# ‘बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना’ की भ्रष्टाचाराचे कुरण? : भाजप आमदार

**नागपूर :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महत्त्वाकांक्षी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजनेच्या अंमलबजावणीवर खुद्द सत्ताधारी पक्षातूनच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. "चांगल्या हेतूने सुरू झालेली ही योजना स्थानिक पातळीवर भ्रष्टाचाराचे कुरण झाली आहे का?" असा तिखट सवाल भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांनी विधानपरिषदेत विचारला. ठाण्यातील एका केंद्रावर चक्क साडीचे दुकान सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याचे डावखरे यांनी सभागृहात सांगितले.

विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत होते. यावेळी ठाणे-कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी 'आपला दवाखाना' योजनेतील अनागोंदीवर बोट ठेवले. ते म्हणाले, राज्य सरकारने जाहीर केलेल्या ३४२ (किंवा ७००च्या व्यापक आकडेवारीमध्ये) ‘हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना’ व ४००+ (किंवा केंद्रिय निधीद्वारे २२३२) नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांपैकी किती केंद्रे प्रत्यक्षात चालू आहेत? काही केंद्रे बंद असल्याच्या तक्रारींवर काय उपाययोजना केली आहे? ठाणे महानगरपालिकेमार्फत चालवल्या जाणाऱ्या ‘आपला दवाखाना’ उपक्रमातील दवाखाना बंद आढळला का आणि तिथे साडीचं दुकान होतं का? असा सवाल भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी सभागृहात उपस्थित केला.

अनेक ठिकाणी फार्मसी पदवीधर/पदवीधर नसेल म्हणून औषधपुरवठ्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे; या संदर्भात ठाणे महानगरपालिकेने घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिलेले स्पष्टीकरण अत्यंत अपूर्ण आणि असमाधानकारक होते. या अनियमिततेवर ठोस कारवाई करण्यात आली आहे का? केली असल्यास त्या बाबतची माहिती सभागृहात सादर करावी, अशी मागणी डावखरे यांनी केली.

‘आपला दवाखाना’ येथे रुग्णांच्या प्राथमिक वैद्यकीय चाचण्या केल्या जातात आणि नंतर पुढील रुग्णालयात रेफर केले जाते. परंतु रेफर केलेल्या रुग्णालयांमध्ये खरोखरच बेड्स आणि डॉक्टर उपलब्ध असतात का? अनेक ठिकाणी फक्त टेक्निशियन उपस्थित असल्याच्या तक्रारी आहेत. संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती व कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी ठोस कारवाई होणार का? असाही सवाल निरंजन डावखरे यांनी उपस्थित केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० डिसेंबर २०२५

## राज्य नाट्य स्पर्धेत "तीन पैशाचा तमाशा" या नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** राज्य नाट्य स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर केंद्रावर स्पर्धेत चुरस वाढत असून दिनांक 06 डिसेंबर रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बीड तर्फे हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे बर्टोल्ट ब्रेक्त (अनुवाद - पू.ल.देशपांडे) लिखीत व असलम युनूस दिग्दर्शीत "तीन पैशाचा तमाशा" या नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण झाले.

भिकाऱ्यांचे सोंग घेऊन व्यवसाय करणारे रॅकेट, गुन्हेगारी, गरीब श्रीमंत दरी, कायद्याचा दुरुपयोग करणारे यावर विनोदी व व्यंगात्मक पद्धतीने भाष्य करणारे हे नाटक असून नेपथ्य, संगीत, प्रकाश, रंगभूषा- वेशभूषा यांमुळे प्रेक्षकांना ते भावले असल्याचे कलाकारांनी सांगितले. सौ.के.एस.के.महाविद्यालय, नाट्यशास्त्र विभागाच्या सहकार्याने हा प्रयोग पार पडल्याचे डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी सांगितले. आव्हानात्मक असलेल्या या नाटकासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बीड च्या अध्यक्षा डॉ. दिपा क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले.

छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्ह्यातील कलाकारांमध्ये ही प्राथमिक फेरीतील स्पर्धा असून यातून प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे नाटक अंतिम फेरीसाठी निवडल्या जातील. खऱ्या अर्थाने हौशी विशेषता नवीन कलावंतांसाठी राज्य नाट्य स्पर्धा ही एक पर्वणीच असते त्यामुळे या स्पर्धेमुळे अनेक नवोदित कलावंत, तंत्रज्ञ घडत असतात. यावेळी देखील एकूण वीस नाटकांमध्ये ही स्पर्धा आहे हे विशेष. "तीन पैशाचा तमाशा" या नाटकामुळे स्पर्धा अधिक रोमांचक झाली आहे यात शंका नाही.

तीन पैशाचा तमाशा या नाटकात सहभागी कलावंत यशराज सवई,अभिषेक इनकर, स्नेहा व्हरकटे, निकीता काशीद, अभिषेक घुले, शैलेश थोरात, सागर धनवे, शुभम पाटोळे, किरण काळे, मिलींद शिवनीकर, कोयल काळे, तनिष्का देवकर, शरद भांगरे, सायली गायकवाड, शिवराज झांबरे, मिलींद शिवनीकर, निखील काकडे, संस्कृती अंधारे, प्रणिता वीर आणि वाल्मीक गाणार यांनी भूमिका केल्या असून तांत्रिक कलावंत म्हणून खालील कलाकारांनी सहभाग नोंदवला नेपथ्य -अमित गाढे, प्रकाश योजना- अशोक घोलप, अमन तांगडे, संगीत संयोजन- पवन शिंदे, संगीत सहाय्य- आविष्कार क्षीरसागर, ज्ञानेश्वर बिचुकले, तृप्ती दराडे, रंगभूषा आणि वेशभूषा- प्रा.डॉ. संजय पाटील देवळाणकर, रंगमंच व्यवस्था- मिलींद शिवनीकर कबीर जाधव, हर्षवर्धन जावळे, अमर मोरे, सहकार्य डॉ. दुष्यंता रामटेके, प्रा. विजय राख यांनी केले.

बीड केंद्रावर एकूण सहा नाटके सादर होणार आहेत त्यापैकी तिसऱ्या क्रमांकावर झालेली नाटक म्हणजे तीन पैशाचा तमाशा. या नाटकात नाट्यशास्त्र विभाग, सौ . के.एस.के. महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थी सहभागी असून अशा दर्जेदार कलाकृती नाट्यप्रयोग रुपी होणे गरजेचे आहे. जागतिक पातळीवरील दर्जेदार नाटके मराठीत अनुवाद होऊन अधिकाधिक नाट्य प्रयोग व्हायला पाहिजे या अनुषंगाने "तीन पैशाचा तमाशा" या नाटकाचे विशेष महत्व असल्याचे दिग्दर्शक असलम युनूस यांनी सांगितले.

## राष्ट्रीय शालेय हॉकी स्पर्धेसाठी सांची संदेश सुरडकरची निवड



**अहिल्यानगर :** दि. 6 व 7 डिसेंबर रोजी कोळपेवाडी, अहिल्यानगर येथील गौतम पब्लिक स्कूल येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत 14वर्ष गटातील सांचीने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे तिची राष्ट्रीय शालेय हॉकी स्पर्धेसाठी करण्यात निवड करण्यात आली. ही ग्वालियर, मध्य प्रदेश येथे होणार आहे.

तिच्या उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल तिला स्पर्धेतील सामनावीर' ही ट्रॉफी प्रदान करण्यात आली. सांची संदेश सुरडकरछावणी येथील रेजिमेंटल चिल्ड्रन्स हायस्कूल या शाळेची विद्यार्थिनी आहे राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय पातळीवर निवड मिळवण्याचा मान मिळवला आहे.

तिच्या मेहनत, धडाडी आणि सातत्यपूर्ण सरावामुळे तिला हे यश मिळाले. तिच्या कामगिरी मुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.सांचीला या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक संजय तोटावाड व अकबर खान यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

## जिंतूर महामार्ग पोलिसांकडून वाहन चालक यांना जनजागृती मोहीम सुरू



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** महामार्ग पोलीस केंद्र केंद्र जिंतूर यांच्यावतीने वाहन चालकांना वाहनांच्या नियमाबद्दल जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. त्या दरम्यान चालक आणि प्रवासी यांना भारतात आणि महाराष्ट्रमध्ये वाढत चाललेल्या अपघात बाबत व विदाऊट हेल्मेट, सीटबेल्ट, ट्रीपल सीट बाबत चालक व प्रवासी यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच लेन कटिंग, वळण रस्त्यावर योग्य वाहतूक चिन्ह यांचा वापर, भरधाव वेगाने वाहन न चालवणे, मद्यप्राशन करून वाहन न चालवणे, तसेच हेल्मेट वापरण्याचे फायदे आणि विना लायसन्स, इन्शुरन्स नसल्यास होणारे नुकसान या बाबत व अपघात न होण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच अपघातग्रस्तांना मदत करने मदत केल्यास तुम्हाला पोलीसाकडून कोणतीही अडचण येणार नसल्याची कल्पनाही वाहन चालक व प्रवाशांना देण्यात आली. तसेच अपघात संबंधाने मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश बाबत माहिती दिली.

या वेळी वाहतुकीचे नियमाचे पालन करण्या संबंधी मार्गदर्शन करण्यात आले जनजागृती कार्यक्रम करिता वाहन चालक आणि प्रवासी हजर होते. यावेळी महामार्ग पोलीस केंद्र जिंतूरचे सपोनी विनायक जाधव तसेच पोलीस अंमलदार भागवत घोडके, संघपाल पारखे इतर कर्मचारीही हजर असे होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० डिसेंबर २०२५

# स्वातंत्र्यानंतर खेडा गावात प्रथमच पोहचली महामंडळाची बस



**कन्नड (अरुण थोरात):** भारतीय स्वातंत्र्यानंतर तालुक्यातील खेडा या गावात दि.08 रोजी डिसेंबर रोजी प्रथमच राज्य परिवहन महामंडळाची बस पोहचली. बसच्या आगमनाने आनंदित झालेल्या ग्रामस्थानी बसचे वाहक व चालक यांचा सत्कार करून स्वागत केले. सुमरे 800 लोकसंख्या असलेल्या या गावात स्वातंत्र्यापासून बसची सुविधा नव्हती.

मात्र गावाकऱ्यांच्या मागणी नुसार आगार प्रमुख स्वाती बाखडे, स्थानक प्रमुख संघर्ष पगारे,वाहतूक नियंत्रक अंकुश गाडेकर, अमोल भिंगारे यांच्या पुढाकारातून बस सुरु झाली आहे. सदर बस कन्नड हुन सकाळी 8.00 वाजता निघून शिवराई, हतनूर,जैतापूर, खेडा मार्गे आठेगाव जाऊन पुन्हा त्याच मार्गे कन्नडला येते, सदर बस दुपारी 4 वाजता कन्नडहुन निघून साडेचार वाजता आठेगाव येथे पोहचते. या बस मुळे खेडा गावातील विद्यार्थी, रुग्ण, वयस्कर ग्रामस्थ्यांची दळणवळंनाची सोय झाली आहे. यामुळे ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी वाहक संगीता शेळके, चालक रत्नाकर पंढरे यांचा ग्रामस्थानी सत्कार केला.यावेळी शिवाजी शेळके, सोमनाथ शेळके, नानासाहेब वाकडे, संदीप वाळुंजे, रामेश्वर जीवरक,शिवाजी जाधव, श्रीकांत जाधव, गोविंद शेळके, बाळासाहेब घोडके उपस्थित होते.

# इंस्टाग्रामवर महिलेचे बनावट खाते तयार करुण बदनामी करणारा गजाआड




**कन्नड (अरुण थोरात):** इन्स्टाग्रामवर महिले च्या नावे बनावट खाते तयार करुन इतर महिलांना अश्लील चॅटींग करणारा संभाजीनगर ग्रामीण पोलीसांनी सायबर भामट्याला ताब्यात घेतले आहे. दि.१३ आक्टोंबर रोजी महिला तक्रारदार यांनी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायबर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुरनं क्र. ०८/२०२५ कलम ६६(C) आयटी ऍक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तक्रारदार महिलेचे फोटोचा वापर करुन बनावट इन्स्टाग्राम खाते तयार केले व इतर महिलांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवुन तक्रारदार महिला असल्याचे भासवत त्यांच्या सोबत अश्लील संभाषण करायचा. त्यावरुन फिर्यादी महिलेने इन्स्टाग्रामवर होणाऱ्या बदनामीस कंटाळुन सायबर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास करतांना पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे व पथकाने तपास करुन सदर बनावट इन्स्टाग्राम खात्याची माहिती प्राप्त करुन त्याचे तांत्रीक विश्लेषण करता, त्यामध्ये आरोपी जलील शहा खलील इनामदार रा.भऊर ता.वैजापुर यांने, त्याचे बहीनीचे मोबाईलवर ओटीपी घेवुन त्याचे स्वत:चे मोबाईल मध्ये बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करून तो तक्रारदार महिलेच्या नावाचा व फोटोचा वापर करत होता. त्यावरून सदर इसमास शिताफीने ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यात असलेल्या मोबाईल फोन मध्ये महिलेच्या नावाचे /फोटोचे इन्स्टाग्राम खाते दिसुन आले. तसेच त्यानेच सदर बनावट खाते तयार केल्याची कबुली दिली असल्याने आरोपी विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपासपथक नेमुण सहायक पोलीस निरीक्षक विजयसिंग जोनवाल, सफौ कैलास कामठे, दत्ता तरटे, सविता जायभाये, मुकेश वाघ, योगेश तरमळे, राजेश राठोड, सायबर पोलीस ठाणे यांनी यशस्वी केली. सायबर गुन्हयापासुन सावध रहा, कोणत्याही अनोळखी व्यक्ती संशयास्पद संदेशावर विश्वास ठेवु नका. असे अवाहन सायबर पोलीसांनी केले आहे.

# माकडा रे माकडा

माकडा रे माकडा
करतोस तू हुप हुप
झाडावरील फळं खाऊन
मस्ती करतोस खूप

या झाडावरून त्या झाडावर
मारतोस तू उड्या
छतावरील कौलारू फोडून
करतोस तू खोड्या

समोरचे पाय म्हणजे
जणू तुझे हात
उंच शेंड्यावर जाऊन
बसतोस आंबे खात

मजा वाटते भारी
लांब शेपटी पाहून
कुणी खोडी केली तर
येतोस अंगावर धावून

माकडा रे माकडा
पुरे झाली तुझी मस्ती
झाडावरुन उतरून
कर आमच्याशी दोस्ती



**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० डिसेंबर २०२५


## सरदार वल्लभभाई पटेल दिव्यरत्न पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी):** ज्याला कोणी नाही वाली त्याला कृपाळू वृद्धाश्रमाची सावली या ब्रीदवाक्या प्रमाणे 25 ते 30 नीराश्रीत निराधार आजी आरोबांचा मोठ्या मायेने आणि ममतेने स्वखर्चाने कसलीही सरकारी मदतीविना सांभाळ करणारे कृपाळू वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. संतोष (अण्णा) सुरडकर (छ. संभाजीनगर) यांना बडोदा येथील गायत्री विकलांग मानव मंडळ या संस्थेच्या वतीने दि. 07/12/2025 विश्व दिव्यांग दिवस औचित्य साधून सरदार वल्लभभाई पटेल दिव्यरत्न पुरस्कार देवून गौरवण्यात आले.

## वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांकडून इंडस्ट्रीयल व्हिजीट




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा, येथील वाणिज्य विभाग कॉमर्स असोसिएशन च्या विद्यार्थ्यांकडून दिनांक 08.12.2025 रोजी इंडस्ट्रीयल वीजीट करण्यात आली.

भेट देण्यासाठी एकूण 60 विद्यार्थी आणि 6 प्राध्यापकांचा समावेश होता. या भेटी द्वारे विद्यार्थ्यांना एखादा उद्योग कसा उभा करता येईल आणि त्यासंबंधी येणाऱ्या अडचणी कशा सोडवता येतील या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

औद्योगिक भेटीचे चे मार्गदर्शन प्राचार्य डॉ संजय अस्वले सर आणि वाणिज्य विभाग प्रमुख डॉ अजित अष्टे सर यांच्याकडून करण्यात आले. या भेटीमध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या 5 उद्योगांचे उद्योजकाकडून सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांकडून उद्योजकांची मुलाखत घेण्यात आली.याप्रसंगी डॉ खंडू मुरळीकर, डॉ विजय मुळे, प्रा. अक्षता बिरादार, प्रा.संध्या चौगुले, प्रा. विद्या गायकवाड इत्यादी उपस्थित होते.










महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० डिसेंबर २०२५

# मानवी हक्कांचा संघर्ष आणि बदलत्या काळातील हक्कांचे संदर्भ

मानवाच्या जन्मासोबतच मिळणारे जीवन, स्वातंत्र्य, समानता, सन्मान आणि सुरक्षिततेचे मूल्य म्हणजेच मानवी हक्क. मानव हा 'मानव' म्हणून जन्माला येतो, कोणत्याही परवानगीशिवाय; त्याचप्रमाणे त्याचे हक्कही नैसर्गिक, मूलभूत आणि सर्वव्यापी असतात. या विचाराची जागतिक मान्यता मिळण्याचा ऐतिहासिक क्षण म्हणजे १० डिसेंबर १९४८, जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने 'मानवी हक्कांची सार्वभौम घोषणा' स्वीकारली. त्याच स्मरणार्थ दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा होतो. हा दिवस केवळ औपचारिक साजरीकरणापुरता मर्यादित नसून मानवजातीनं भोगलेल्या अन्यायाच्या इतिहासाची आठवण, वर्तमान सामाजिक वास्तवाचे मूल्यांकन आणि भविष्य काय असले पाहिजे यावरील चिंतनाचा दिवस आहे. मानवी हक्कांची संकल्पना ही न्याय, समता, स्वातंत्र्य आणि मानवी सन्मान या चार मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर मानवी हक्क म्हणजे केवळ कायद्याची चौकट नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आणि सत्ता, समाजरचना आणि व्यक्ती यांच्या नात्याचा पुनर्विचार आहे.मानवी हक्कांचा विचार केवळ आधुनिक नसून त्याची सुरुवात मानव इतिहासाच्या संघर्षातून झालेली आहे. गुलामगिरीची प्रथा, स्त्रीचा दासभाव, जातीय व वर्णभेद, धर्माच्या नावाखाली केलेला छळ, वसाहतवाद, नरसंहार, भूदासत्व, भूदलालशाही, उपनिवेशवाद आणि युद्धातील क्रौर्य याने मानवी अस्तित्वाला नेहमीच मोठे आव्हान दिले. विशेषतः दुसऱ्या महायुद्धातील हॉलोकॉस्ट हा जगाच्या विवेकाला हादरा देणारा प्रसंग ठरला. लाखो निरपराध लोकांचे प्राण युद्धप्रणीत द्वेषभावना, वंशश्रेष्ठत्व आणि राजकीय क्रौर्याने निगलले. यामुळेच जगाने पहिल्यांदाच एकत्र येत मानवाधिकारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता देण्याचा निर्णय घेतला. समाजशास्त्रीय दृष्टीने या कृतीचे महत्त्व असे की अधिकार हे सरकारकडून दिलेले नसून सरकार हे त्या अधिकारांचे रक्षण करणारे असायला हवे, ही संकल्पना जगभर पसरली. राज्यसत्ता, कायद्याची अंमलबजावणी आणि नागरिकांचे अस्तित्व या तिन्हींचा संबंध नव्याने परिभाषित झाला.आज मानवी हक्कांचा विस्तार केवळ व्यक्तिगत हक्कांपुरता मर्यादित नसून तो सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि डिजिटल हक्कांपर्यंत पोहोचला आहे. शिक्षणाचा हक्क, आरोग्याचा हक्क, गोपनीयतेचा हक्क, माहितीचा हक्क, इंटरनेट प्रवेशाचा हक्क, स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, रोजगाराचा हक्क किंवा भेदभावमुक्त जीवनाचा हक्क ही संकल्पना आज जागतिक चर्चेचा केंद्रबिंदू आहेत. पण या सर्व हक्कांच्या अंमलबजावणीत सर्वात मोठी अडचण म्हणजे समाजघटकांची असमान रचना. वंश, जात, धर्म, लिंग, भाषा, वर्ग, वृद्धत्व, अपंगत्व किंवा लैंगिक ओळख यांच्या आधारावर लोकांमध्ये भेदभाव निर्माण होतो आणि हक्कांची संकल्पना आदर्श राहून प्रत्यक्षात व्यर्थ ठरते. समाजशास्त्रीय सिद्धांतानुसार, जेव्हा सत्ता आणि संसाधने एखाद्या वर्गाच्या हातात केंद्रीत होतात तेव्हा वेगळ्या ओळखीच्या गटांना हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. म्हणूनच मानवी हक्कांचा इतिहास हा वंचितांच्या संघर्षाचा इतिहास आहे. आजही जगभरातील असंख्य समुदाय आपल्या अस्तित्वासाठी आणि सन्मानासाठी लढत आहेत.भारतातील परिस्थिती वेगळी नाही. भारतीय संविधान स्वतःच मानवाधिकारांच्या संकल्पनेचे सर्वात मोठे दस्तऐवज आहे. प्रास्ताविकेत नमूद केलेली सामाजिक न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये या संघर्षाची दिशा दर्शवतात. मूलभूत हक्कांनी प्रत्येक व्यक्तीला कायद्यापुढे समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, संरक्षणाचा हक्क आणि मानहानिवर बंदी यांसारखे अनेक हक्क प्रदान केले आहेत. परंतु भारतीय समाजाची रचना ऐतिहासिकदृष्ट्या विषमतापूर्ण आहे. जातव्यवस्थेने निर्माण केलेला अस्पृश्यता आणि भेदभावाचा वारसा आजही अनेक जीवनांवर अन्याय करत आहे. आदिवासी, दलित, महिला, अल्पसंख्याक, वृद्ध, दिव्यांग, लैंगिक अल्पसंख्याक आणि आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांसाठी मानवी हक्क हा अजूनही संविधानिक शब्द असून जीवनातील वास्तव नाही. विशेषतः महिलांविरुद्ध हिंसा, ऑनर किलिंग, मानवी तस्करी, बालविवाह, सायबर बुलिंग, धार्मिक ध्रुवीकरण, ट्रान्सजेंडर समुदायाचा सामाजिक बहिष्कार, गरीबी, भूक, बेरोजगारी आणि सामाजिक सुरक्षा अभाव या प्रश्नांनी मानवाधिकारांच्या अंमलबजावणीला कठीण केले आहे. न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेतली दिरंगाई, न्यायसंस्थेतील तांत्रिक अडथळे आणि सत्ताधारी वर्गाचा राजकीय अजेंडा अनेकदा नागरिकांच्या हक्कांना मर्यादित करतो.डिजिटल युगात मानवी हक्कांचे नवे परिमाण उदयास आले आहेत. एकीकडे तंत्रज्ञानाने व्यक्तीला अभिव्यक्ती आणि माहितीचा अपार विस्तार दिला तर दुसरीकडे डिजिटल निरीक्षण, डेटा चोरी, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनियंत्रित वापर, ओळख नियंत्रण आणि सायबर अत्याचार यांनी नव्या प्रकारची दडपशाही निर्माण केली आहे. 'डिजिटल कॉलोनायझेशन' ही संकल्पना आता चर्चेत आहे. मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या डेटा, मत, वर्तन आणि निर्णय नियंत्रित करण्याची क्षमता मिळवून लोकशाही आणि मानवी स्वातंत्र्यासाठी धोका बनत आहेत. त्यामुळे मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी कायदे, धोरणे आणि जागतिक मार्गदर्शक तत्वे या क्षेत्रात आवश्यक झाली आहेत. Future Rights किंवा भविष्यातील मानवी हक्क ही संकल्पना आता वाढत आहे, ज्यामध्ये जैविक हक्क, न्यूरो-राइट्स, डिजिटल ओळख आणि कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण होणाऱ्या असमानतेविरुद्ध संरक्षण समाविष्ट आहे.मानवी हक्कांचे संरक्षण हे केवळ सरकार, संस्था किंवा कायद्याचे काम नाही, तर समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांचे हक्क जपताना नागरिकांनी कर्तव्यांचे भान ठेवणे आवश्यक आहे. हक्क आणि कर्तव्य यांचा संतुलित विचारच लोकशाही समाजाला बळकटी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता मानवाधिकारांची संकल्पना केवळ व्यक्तीच्या संरक्षणापुरती मर्यादित नसून ती समाजाच्या नैतिकतेची ओळख आहे. एक समाज किती विकसित आहे हे मोजण्याचे मापदंड GDP, विकासदर किंवा तांत्रिक प्रगती नसून त्या समाजातील दुर्बल घटक किती सुरक्षित, सन्मानित आणि स्वतंत्र जीवन जगतात हे आहे. म्हणूनच मानवाधिकार संरक्षणासाठी शिक्षण, जागरूकता, संवेदनशीलता, सामाजिक समावेशकता आणि मानवी मूल्यांची पुनर्रचना आवश्यक आहे. मीडिया, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि युवकांनी या प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेतली तर न्यायपूर्ण आणि संवेदनशील समाज उभारणे शक्य आहे.आजच्या काळात जगासमोर असणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे युद्ध, पर्यावरणीय संकटे आणि मानव विस्थापन. युक्रेन, पॅलेस्टाईन, आफ्रिका, सिरिया, म्यानमार, अफगाणिस्तान येथे लाखो लोक युद्ध, दहशतवाद, राजकीय अस्थिरता आणि मानवविरोधी धोरणांचे बळी ठरत आहेत. निर्वासित, स्थलांतरित आणि सीमाविहीन जीवन वितळलेल्या मानवतेचा चेहरा बनून उभे आहे. या परिस्थितीत मानवाधिकारांचे महत्त्व अधिक जाणवते. कारण मानवतेचे अस्तित्वच आज धोक्यात आहे. मानवाधिकार दिन आपल्याला आठवण करून देतो की मानवजातीतला सर्वात मोठा धर्म एकच आहे तो म्हणजे मानवता. आणि मानवतेचे सर्वात महत्त्वाचे शस्त्र एकच म्हणजे न्याय.आज आपण या दिवशी प्रतिज्ञा करायची आहे की मानवी हक्क म्हणजे घोषणा वा कायदा नसून जीवन जगण्याची पद्धत आहे. प्रत्येक मानवाचे अस्तित्व मूल्यवान आहे, त्याचा आवाज ऐकला गेला पाहिजे, त्याचा सन्मान राखला गेला पाहिजे आणि त्याचे हक्क कुणीही हिरावून घेऊ शकत नाहीत. मानवतेच्या इतिहासात अनेक क्रांती झाल्या, अनेक व्यवस्था कोसळल्या, अनेक साम्राज्ये नष्ट झाली, पण मानवी सन्मानाचा शोध कायम राहिला. कारण शेवटी मानवाचा सर्वात मोठा विजय हा इतरांवर नव्हे, तर स्वतःतील हिंसा, दडपशाही आणि अन्यायावर असतो. म्हणूनच या दिवसाचा खरा संदेश एकच आहे, 'जिथे मानव आहे तिथे हक्क आहेत, आणि जिथे हक्क आहेत तिथे न्याय आणि समतेचा प्रकाश असायलाच हवा.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२, ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० डिसेंबर २०२५

# पर्यावरणीय अधिकार : मानवाधिकारांची बदलती परिभाषा

जगभरातील देश मानवाधिकार दिन दरवर्षी १० डिसेंबरला साजरा करतात. तेव्हा मानवी अधिकाराची तत्वे, सन्मान, समता व स्वातंत्र्याच्या मूल्यांचा गौरव करतात. संयुक्त राष्ट्रांच्या मते, मानवाधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्तीला फक्त “मानव म्हणून” जन्मल्यामुळे मिळणारे मूलभूत, सार्वत्रिक आणि अविभाज्य हक्क, जे व्यक्तीच्या सन्मान, स्वातंत्र्य, समता, न्याय आणि सुरक्षितता यांची हमी देतात. हे हक्क सरकार किंवा समाजाकडून दिले जात नसून मनुष्याच्या अस्तित्वासोबतच नैसर्गिकरित्या प्राप्त असतात. परंतु काळ बदलला तसा मानवाधिकारांची व्याख्याही बदलली आहे. आज मानव ज्या जगात जगत आहे, त्या जगाचे आरोग्य अत्यंत अस्थिर अवस्थेत पोहोचले आहे. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, सुरक्षित जमीन आणि स्थिर हवामान नसताना मानवाच्या कोणत्याही हक्कांची व्यावहारिक अंमलबजावणी शक्य नाही. त्यामुळे आज मानवाच्या मूलभूत अधिकारांमध्ये सर्वात अग्रस्थानी आलेला अधिकार म्हणजे स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत पर्यावरणाचा अधिकार ज्याशिवाय मानवजीवनाचा एकही क्षण सन्मानपूर्वक जगता येत नाही.

मानवाचे पर्यावरणीय अधिकार म्हणजे प्रत्येक व्यक्तीस स्वच्छ, सुरक्षित, आरोग्यदायी आणि शाश्वत पर्यावरणात जगण्याचा मूलभूत मानवाधिकार. आधुनिक काळात पर्यावरण आणि मानवकल्याण यांचा संबंध अधिक घट्ट झाला असल्याने संयुक्त राष्ट्र, विविध देशांचे संविधान, न्यायालये आणि आंतरराष्ट्रीय करारांनी या संकल्पनेला कायदेशीर व नैतिक मान्यता दिली आहे. म्हणूनच “स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरणाचा अधिकार” हा आज जागतिक पातळीवर एक नवा पण आवश्यक मानवाधिकार म्हणून उदयाला आला आहे. प्रत्येक व्यक्तीस स्वच्छ, सुरक्षित, आरोग्यदायी व शाश्वत पर्यावरणाचा अधिकार, हा अधिकार केवळ “भौतिक” संसाधनांपुरता मर्यादित नसून आरोग्य, मानवी सन्मान, उपजीविका, अन्नसुरक्षा, निवासाचे हक्क आणि जीवनमान यांच्याशी थेट संबंधित आहे. पर्यावरणाची गुणवत्ता खालावल्यास रोग, दारिद्र्य, स्थलांतर, हवामान असंतुलन आणि सामाजिक विषमता वाढतात; त्यामुळे पर्यावरणीय अधिकारांना मूलभूत मानवी हक्कांच्या श्रेणीत स्थान देणे आवश्यक बनले आहे.

या संकल्पनेची मुळे १९७२ च्या स्टॉकहोम पर्यावरण परिषदेत दिसतात, जिथे प्रथमच “मनुष्याला प्रतिष्ठेने जगण्यासाठी गुणवत्तापूर्ण पर्यावरणाचा अधिकार आहे” असे घोषित करण्यात आले. पुढे १९९२ च्या रिओ पृथ्वी परिषद, २०१२ च्या तसेच २०१५ च्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये (SDGs) पर्यावरणीय हक्कांना मध्यवर्ती स्थान दिले गेले. २०२२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने “Right to a Clean, Healthy and Sustainable Environment” या अधिकाराला अधिकृत मान्यता दिली. हा ठराव मानवी इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. यामुळे सदस्य राष्ट्रांवर पर्यावरण संरक्षणाची नैतिक व धोरणात्मक जबाबदारी वाढली, पर्यावरणीय हानीविरुद्ध लढण्यासाठी मानवाधिकाराचा कायदेशीर पाया मजबूत झाला, संयुक्त राष्ट्रांचे मत स्पष्ट आहे, मानवाचे अस्तित्व पृथ्वीच्या आरोग्याशी जोडलेले आहे, म्हणून पृथ्वीच्या पर्यावरणीय व्यवस्थांचे संरक्षण करणे हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नसून मानवाधिकारांचा पाया बनतो. कल्याणकारी राज्य व्यवस्थेमध्ये नागरिकांना सर्व अधिकार व त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी ही राज्यव्यवस्थेची ठरते. त्यामुळे पर्यावरणीय अधिकार हा मुलभूत अधिकार म्हणून मान्य करून त्याचे रक्षण करणे गरजेचे ठरते. भारतीय संविधानात स्वतंत्रपणे पर्यावरणीय मानवाधिकाराचा उल्लेख नसला, तरी अनुच्छेद २१ “जीवनाचा अधिकार” हा स्वच्छ व सुरक्षित पर्यावरणाचा हक्क समाविष्ट करतो, असे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांद्वारे स्पष्ट केले. शिवाय मार्गदर्शक तत्वे यामध्ये सुद्धा उल्लेख आहे.
मानवाची प्रगती गेल्या शतकात अविश्वसनीय वेगाने झाली असून उद्योगक्रांतीनंतर तंत्रज्ञान, उत्पादन, नागरीकरण यांचा वेग अवास्तव झाला. या प्रगतीने सोयी निर्माण केल्या, आर्थिक वाढ दिली, पण या प्रक्रियेत मानवाने पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांचा असा अवाजवी वापर केला की, आज पर्यावरणीय संकट मानवनिर्मित आपत्तीच्या रूपात समोर उभे झाले असून वायूप्रदूषण, जलसंकट, अन्नसुरक्षेची भीती, तापमानवाढ, तसेच जंगलांचे आणि सागरी संपत्तीचे ऱ्हास या सर्वांचा परिणाम मानवाच्या सर्व अंगांनी जाणवू लागला आहे.

आज जगभरात हवेच्या प्रदूषणामुळे दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण भागातही रासायनिक खतांचा अतिरेक, वाहतुकीत वाढ आणि औद्योगिक धूर यामुळे हवा विषारी होत चालली आहे. यामुळे दमा, श्वसनतक्रारी, हृदयविकार, बालकांमधील अस्थमा, गर्भवती महिलांमधील गुंतागुंत अशी नवी रोगप्रवणता वाढताना दिसते. हवा म्हणजे केवळ निसर्गाचा घटक नसून ती मानवाच्या प्रत्येक पेशीशी जोडलेली आहे. पृथ्वीचे सरासरी तापमान सतत वाढत आहे. एकेकाळी दुर्मीळ असलेली उष्णतेची लाट आता प्रत्येक उन्हाळ्यात नियमित होऊ लागली आहे. तापमानवाढीमुळे शेतीचे उत्पादन घटते आहे, पिकांची पोषणमूल्ये कमी होऊन अन्नधान्याचे दर त्यामुळे वाढले आहे. हवामान बदल म्हणजे केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही; तो समाजातील आर्थिक, आरोग्यविषयक आणि सामाजिक विषमता अधिक वाढवणारा घटक ठरतो. त्यामुळे हवामान बदलाच्या भीषण परिणामांचे नियंत्रण करणे म्हणजे प्रत्यक्षात मानवाच्या जीवनमूल्यांचे संरक्षण होय. तसेच पाण्याचे संकट भविष्यातील सर्वात मोठा संघर्ष ठरू शकतो. भारतात पावसातील अनियमितता, भूजलाचा अतिवापर आणि अनियोजित नागरीकरणामुळे जलस्रोत झपाट्याने कमी होत आहेत. अनेक शहरांना उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो, तर ग्रामीण भागात सिंचनअभावी शेतीचे अर्थचक्र विस्कळीत होते. दूषित पाणी आणि अपुरी स्वच्छता यामुळे पसरलेले आजार गरीब कुटुंबांच्या आयुष्याला थेट धोका निर्माण करतात. म्हणूनच जलसुरक्षा हा आजचा सर्वात अत्यावश्यक पर्यावरणीय अधिकार ठरतो. शिवाय नैसर्गिक संसाधनांवरील ताण इतका वाढला आहे की जगातील सुमारे दहा लाख प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. जैवविविधतेचे अस्तित्व हे पृथ्वीच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असताना जंगलतोड, औद्योगिक विस्तार, खनिज उत्खनन, रासायनिक प्रदूषण आणि हवामान बदल यांनी निसर्गाचे संतुलन ढासळवले आहे. जंगलाचा ऱ्हास म्हणजे केवळ झाडांची संख्या कमी होणे नव्हे; तर कार्बन शोषण क्षमतेत घट, मातीची धूप, जलचक्रातील बदल, वन्यजीवांचे स्थलांतर आणि मानव-वन्यजीव संघर्षासारख्या गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होणे होय. मानव आणि पर्यावरण यांचे नाते परस्पर अवलंबित्वाच्या पायावर टिकलेले आहे. पण मानवाने विकासाच्या नावाखाली या नात्याचे संतुलनच बिघडवले आहे. मोठ्या शहरांमध्ये झपाट्याने वाढलेली लोकसंख्या आणि कचऱ्याचे ढिगारे ही समस्या आता केवळ व्यवस्थापनाची नाही; ती अस्तित्वाची झाली आहे. आपण निर्माण करत असलेल्या कचऱ्याचा मोठा भाग प्रक्रिया न होता नद्यांत, जमिनीत किंवा समुद्रात मिसळतो. या सर्वांचा परिणाम शेवटी अन्नसाखळीला होतो आणि मानव स्वतः त्या प्रदूषणाचाभाग बनतो..

मानवाचे पर्यावरणीय अधिकार हा विषय फक्त नैसर्गिक प्रेम किंवा पर्यावरणवादाशी संबंधित राहिलेला नसून आज ही चर्चा केंद्रस्थानी आली आहे. कारण पर्यावरणाचा ऱ्हास हा प्रत्यक्ष मानवाच्या समानतेच्या, आरोग्याच्या, उपजीविकेच्या आणि सुरक्षिततेच्या हक्कांवर परिणाम करतो. विकासाच्या मॉडेलमध्ये पर्यावरणाला मध्यवर्ती स्थान देणे गरजेचे झाले आहे. सध्या जगातील राजकारणातही ‘ग्रीन पॉलिटिक्स’ हा नवा प्रवाह आकार घेत आहे. पर्यावरणाला प्राधान्य देणारी राजकीय चळवळ लोकांच्या मूलभूत हक्कांशी थेट जोडलेली आहे. काही देशांमध्ये ही चळवळ परिपक्व होत आहे; तर काही ठिकाणी तिचा प्रभाव अजून मर्यादित आहे. याच पार्श्वभूमीवर पर्यावरणवादी चळवळी या निसर्ग, जंगल, पाणी, हवा, जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल जपण्यासाठी प्रदूषण, जंगलतोड, मोठे धरण प्रकल्प, हवामान बदल आणि संसाधनांचा अतिवापर यामुळे मानवजातीसमोर निर्माण झालेल्या संकटांना उत्तर म्हणून उदयाला आल्या. जागतिक स्तरावर, ग्रीन मूव्हमेंट, ग्रीनपीस आंदोलन, आणि अर्थ डे आंदोलन या चळवळी अत्यंत प्रभावी ठरल्या. भारतामध्ये सुद्धा पर्यावरणवादी चळवळींनी कायदे आणि सरकारच्या धोरणांवर मोठा प्रभाव टाकला. चिपको आंदोलनामुळे जंगलतोड थांबवली. अप्पिको चळवळीने पश्चिम घाटातील जंगलरक्षणाला गती दिली. नर्मदा बचाओ आंदोलनाने होणारे विस्थापन आणि पर्यावरणीय परिणामांविषयी राष्ट्रीय चर्चा निर्माण केली. सायलेंट व्हॅली आंदोलनमुळे केरळमधील मौल्यवान जैवविविधता वाचवली गेली. दिल्लीतील स्वच्छ हवेची चळवळ यामुळे CNG बस आणि प्रदूषण नियंत्रण उपाय लागू झाले. पण एक गोष्ट स्पष्ट आहे, विकास, रोजगार, औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञान या सर्वांच्या चर्चेत पर्यावरणाला केंद्रस्थानी ठेवले नाही तर पुढील शतक मानवासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. उर्जा वापर, वाहतूक, औद्योगिक धोरण, नागरी नियोजन, जलव्यवस्थापन या सर्व क्षेत्रात हरित धोरणांचा समावेश अनिवार्य आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर विचार केल्यास मानवाचे पर्यावरणीय अधिकार हे फक्त वर्तमानकाळातील नव्हे तर पुढील अनेक पिढ्यांच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्न आहेत. प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन कृतींचा परिणाम पर्यावरणावर होतो. उपभोगवाद कमी करणे, कचरा कमी निर्माण करणे, संसाधनांचा न्याय्य वापर, सार्वजनिक वाहतूक प्रोत्साहन, पाणी बचत, हरित ऊर्जा यांसारखे निर्णय हे ‘लहान’ दिसले तरी त्याचा अर्थपूर्ण परिणाम होतो. पर्यावरणाचे रक्षण हा केवळ सरकारचा किंवा धोरणकर्त्यांचा विषय नसून तो प्रत्येक व्यक्तीच्या जीवनशैलीचे प्रतिबिंब असावा लागेल. जगभरात मानवाच्या सन्मानाच्या, सुरक्षिततेच्या आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांचे जतन करायचे असेल तर सर्वप्रथम पृथ्वीची शाश्वतता वाचवावी लागेल. स्वच्छ हवा, सुरक्षित पाणी, आरोग्यपूर्ण परिसर, प्रदूषणमुक्त जीवनमान या मूलभूत गरज पूर्ण नसताना मानवाधिकारांची आपण कितीही चर्चा केली तरी ते कागदावरचे सिद्धांत ठरतात. पर्यावरण हे मानवाचे पहिलं घर आहे; ते सुरक्षित ठेवणे ही मानवाच्या सर्व हक्कांची पायाभूत अट आहे. जागतिक पातळीवरील पर्यावरणीय संकटे आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे या अधिकारांकडे केवळ पर्यावरणीय प्रश्न म्हणून नव्हे तर मानवाधिकारांचा पाया म्हणून पाहणे आवश्यक ठरते.

पर्यावरण संरक्षण ही आता सरकार, उद्योग किंवा तज्ञ यांची एकट्याची जबाबदारी राहिलेली नाही; ती प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य बनली आहे. म्हणूनच मानवाचे पर्यावरणीय अधिकार हे नव्या मानवतावादी युगाची दिशा ठरवत असून पृथ्वी आणि मनुष्य यांच्यातील संतुलन राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरत असून ती काळाची गरज आहे. एकूणच मानवाचे पर्यावरणीय अधिकार हे आजच्या जगातील सर्वात महत्त्वाचे मानवाधिकार आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने या संकल्पनेला जागतिक स्वीकार दिल्यामुळे पृथ्वीच्या संरक्षणासाठी नवीन नैतिक चौकट निर्माण झाली आहे. येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य ‘विकासाच्या वेगावर’ नाही, तर ‘पर्यावरणाच्या संतुलनावर’ अवलंबून आहे. म्हणूनच मानवाचा सन्मान आणि पृथ्वीचे आरोग्य या दोन्हींचे रक्षण करणे हेच जगाच्या सुरक्षिततेचे खरे अधिष्ठान आहे.



**सुनील भारोडकर**
**नाशिक**
+91 91583 55093